आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

०५ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा केंद्रसरकारचा निर्णय, दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढ्याला रशिया आणि जपानचा पाठिंबा

- राज्य शिक्षण मंडळाच्या, इयत्ता बारावीच्या परीक्षेत ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

- राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी टेक वारी उपक्रम सुरु

**आणि**

- राज्यात आज अनेक ठिकाणी गारपिटीसह अवकाळी पावसाची हजेरी / पुढचे चार दिवस राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. तसंच झेलम नदीवरल्या किशनगंगा धरणाचं पाणी रोखण्याचा विचारही भारत करत असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. २२ एप्रिलला पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी  हल्ल्यात २६ नागरिक मृत्युमुखी पडले होते, त्यानंतर भारतानं पाकिस्तानसोबतचा पाणी वाटपाचा  सिंधु करार रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. १९६० मधे हा करार करण्यात आला होता. बागलिहार धरणावरून भारत आणि पाकिस्तानमधे गेल्या अनेक वर्षापासून वाद आहे.

**<><><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला, आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. भारताच्या दहशतवाद विरोधी लढ्याला रशियाचा संपूर्ण पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळ दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशिया यांच्यातली विशेष धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठीची बांधिलकी व्यक्त केल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी समाजमाध्यमात सांगितलं आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्यात नवी दिल्ली इथं आज द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत जनरल नाकातानी यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला, तसंच भारताला पूर्ण पाठिंबा व्यक्त केला. भारत आणि जपानच्या संरक्षण आणि सुरक्षा यंत्रणांचा आढावाही दोन्ही नेत्यांनी या बैठकीत घेतला. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याबाबबत दोन्ही नेत्यांमधे सहमती झाली. भारत आणि जपान यांच्यातल्या वाढत्या संरक्षण सरावावर दोघांनीही समाधान व्यक्त केलं. तसंच सागरी क्षेत्रातल्या सहकार्यावर भर दिला.

बैठकीआधी नाकातानी यांना तिन्ही सेवा दलांकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. तसंच त्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन शहीद जवानांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. परीक्षेचा एकूण निकाल ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतका लागला आहे. याबाबतचा वृत्तांत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड - व्हॉईस कास्ट- भक्ती (१.२४)**

*(राज्यात ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा घेण्यात आली. एकूण १४ लाख १७ हजार ९६९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या ९ विभागीय मंडळात ही परीक्षा घेण्यात आली.*

*कोकण विभागाचा निकाल ९६ पूर्णांक ७४ शतांश टक्के लागला असून हा विभाग पुन्हा एकदा अव्वल स्थानी आला आहे. त्यापाठोपाठ मुंबई विभागाचा निकाल ९२ पूर्णांक ९३ शतांश टक्के लागला आहे, पुणे- ९१ पूर्णांक ३२ शतांश टक्के, नागपूर- ९० पूर्णांक ५२ शतांश टक्के, छत्रपती संभाजीनगर- ९२ पूर्णांक २४ शतांश टक्के, कोल्हापूर- ९३ पूर्णांक ६४ शतांश टक्के, अमरावती- ९१ पूर्णांक ४३*

*शतांश टक्के, नाशिक- ९१ पूर्णांक ३१ शतांश टक्के, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी, ८९ पूर्णांक ४६ शतांश टक्के इतका लागला आहे.*

*विज्ञान शाखेचा निकाल ९७ पूर्णांक ३५ शतांश टक्के, कला शाखेचा ८० पूर्णांक ५२ शतांश टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९२ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका लागला आहे.*

*विद्यार्थ्यांना उद्यापासून महाविद्यालयात गुणपत्रिका मिळतील.)*

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी इथं उद्या मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दीचं औचित्य साधून ही बैठक चौंडी इथं आयोजित केल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं. या बैठकीत जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांबाबत निर्णय होतील असंही ते म्हणाले.

भाजपच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाच्या इमारतीचं भूमीपूजन उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते होणार आहे. तसंच अहिल्यानगर शहरातल्या शासकीय विश्रामगृहाच्या इमारतीचं उद्धाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**<><><><><>**

राजकीय कार्यसंस्कृती सक्षम करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचं मोठं योगदान असून टेकवारी उपक्रमामुळे राज्यातलं मनुष्यबळ अधिक तंत्रकुशल, गतिमान, पारदर्शक आणि जबाबदार होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. टेक वारी - महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचं आज त्यांच्या हस्ते उद्धाटन

झालं, तेव्हा ते बोलत होते. प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी टेक वारी हा प्रशिक्षण आठवडा आजपासून येत्या ९ मे दरम्यान साजरा करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत ९ मे रोजी दुपारी ३ वाजता या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

<><><><><>

राज्यात शेती, उद्योग, शिक्षण इत्यादी क्षेत्रांमधे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही काळाची गरज बनली असून या क्षेत्रात पुढाकार घेणाऱ्या सर्वांना शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य मिळेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र स्थापन करणं आणि इतर क्षेत्रातला एआयचा वापर, याकरता राज्य शासनानं मायक्रोसॉफ्ट उद्योगाबरोबर करार केला आहे, त्याअंतर्गत बारामती इथं आयटीपार्क किंवा इनोव्हेशन सेंटर उभारण्याबाबत आज मंत्रालयात आयोजित बैठकीत पवार बोलत होते.

<><><><><>

वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर, आता येत्या १५ तारखेला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी होणार होती. मात्र आपण लौकरच सेवानिवृत्त होणार असल्यानं ही सुनावणी भावी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठासमोर होईल, असं सांगून न्यायमूर्ती खन्ना यांनी पुढची तारीख दिली.

या संदर्भात यापूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयानं काही मुद्द्यांवर चिंता व्यक्त केल्यानंतर, केंद्र सरकारनं कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. नोंदणीकृत आणि अधिसूचित वक्फ मालमत्ता, तसंच

वापरकर्त्यांकडून वक्फ घोषित झालेल्या जमिनींच्या सद्यस्थितीवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारनं दिली आहे.

<><><><>

पाकिस्तानी सायबर गुन्हेगारांनी भारतीय लष्कराच्या वेबसाइटला लक्ष्य केल्याची माहिती लष्करी सूत्रांनी दिली आहे. पाकिस्तानी हॅकर्सनी भारताच्या लष्करी अभियांत्रिकी सेवा आणि मनोहर पर्रीकर संरक्षण अध्ययन  आणि विश्लेषण संस्थेमधली संवेदनशील माहिती कथितरित्या चोरली असं सूत्रांनी सांगितलं.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबाद इथं थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल. हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

<><><><>

राज्यात आज अनेक ठिकाणी गारपिटीसह अवकाळी पावसानं हजेरी लावली.
**जालना** शहरासह जिल्ह्यात आज वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आणि काही भागात गारा पडल्या. त्यामुळे आंबा फळपिकासह कांदा बियाणं, उन्हाळी बाजरी, मका आणि इतर पिकांचं नुकसान झालं. मात्र नागरीकांना उकाड्यातून काहीसा दिलासा मिळाला.

**नाशिक** मध्ये  मनमाड शहराला  गारपिटीसह अवकाळी पावसानं  झोडपून काढलं.

**अहिल्यानगर** जिल्ह्यातही आज वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला.   त्यामुळे फळबागांचं आणि काढणीला आलेल्या कांद्याचं  नुकसान झालं.

**वाशीम** मध्येही आज रिसोड आणि वाशिम तालुक्यात गारपिटीसह अवकाळी पावसाच्या सरी आल्या.

**परभणी** जिल्ह्यात सर्वत्र वादळी वाऱ्यासह पाऊस झाला तर तुरळक ठिकाणी गारपीट  झाली. वाऱ्याचा वेग जास्त असल्यानं  काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली. तर वाळत  घातलेली हळद झाकण्यासाठी  तारांबळ उडाली.

**बीड** जिल्ह्यात आष्टी तालुक्यात तब्बल दोन तास अवकाळी पाऊस आणि   मोठी गारपीट झाली.

**हिंगोली** जिल्ह्यात औंढा, कळमनरी, वसमत, सेनगाव तालुक्यात अनेक ठिकाणी पाऊस झाला.

**बुलढाणा** जिल्ह्यात खामगाव, शेगावसह काही भागात  पावसाच्या हलक्या सरी कोसळल्यानं काही प्रमाणात गारवा निर्माण झाला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तुरळ ठिकाणी कमाल तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान वाशिम इथं ४२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, पुढचे चार दिवस  राज्यातल्या चारही  विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी  मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**